REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# गडहिंग्लजची मातृदेवता हिंगलजाई (महालक्ष्मी) : सुमेरियन इनान्ना ते बॅबिलोनियन 'इश्तार' एक ऐतिहासिक अभ्यास

प्रा. रामचंद्र गुर्लिंग घुले
सहा. प्राध्यापक (इतिहास) मा. व. पा. कन्या महाविद्यालय, इस्लामपूर, ता. वाळवा, जि.सांगली.

## प्रास्ताविक:-



मातृदेवता 'दुर्गा' अर्थात महिषासुरमर्दिनीची भारतीय-हिंदु समाजाच्या संस्कृतीवर मोठी मोहिनी असल्याचे आपणास दिसून येते. भारताबरोबर आशियाखंडात तिची मंदिरे-मुर्त्या अद्यापही असून सण-यात्रा-उत्सवाबरोबर तिच्या दंतकथा अख्यायिका प्रचलित आहेत. दुर्गा आमच्याच हिंदु संस्कृतीची रणवीर सौदामिनी देवता असल्याचा समज आहे. प्रस्तुत शोधनिबंधात या देवीचा मुळ उगम व प्रसार शोधताना तिच्या दंतकथा, मुर्तीशास्त्र व लोकसंस्कृतीशास्त्राच्या आधारे गडहिंग्लजची दुर्गा अर्थात महालक्ष्मीला केंद्रस्थानी ठेऊन स्थलसंशोधनाच्या आधारे इतिहास संशोधन करता येईल. कोल्हापूर जिल्ह्याच्या दक्षिणेकडील कर्नाटक सिमेलगतचा तालुका म्हणजे 'गडहिंग्लज' होय. हिरण्यकेशी नदीच्या उत्तर किनाऱ्यावर या गावची वसाहत महापाषाण कालापासूनची आहे. महापाषाण वसाहतीचे अनेक अवशेष या जुन्या वसाहतीत सापडल्याची नोंद प्रागैतिहासिक महाराष्ट्र या ग्रंथात भा. शां. देव यांनी केली आहे. येथून जवळच सामनगड नावाचा सुप्रसिद्ध किल्ला आहे. गडहिंग्लज हे तालुक्याचे ठिकाण असून १६°१०' उत्तर व ७४°२०' अक्षांशावर वसलेले आहे. सन १८५४ पर्यंत सामनगडावरच तालुक्याचे मुख्यालय होते. १८५४ साली गडहिंग्लज नावाचा नवा पेटा तयार करून मामलेदार कचेरी सामानगडावरून गडहिंग्लज येथे नेण्यात आली. हे गाव पूर्वी कापशी घराण्याच्या ताब्यात होते. इ. स. १७०० साली गडहिंग्लज येथे या घराण्यातील एका पुरुषाने एक किल्ला बांधला होता, त्याची आता पूर्णपणे नासधूस झालेली आहे. अठराव्या शतकाच्या अखेरीस ज्या बंडाळ्या झाल्या त्यामध्ये गडहिंग्लज गावावर कान्हेरराव पटवर्धन व निपाणीकर देसाईने अनेक वेळा हल्ले केले होते.[१] आज या शहराचा मोठा विस्तार झाला असून २,१६,२५७ एवढी लोकसंख्या आहे. या शहराला गडहिंग्लज हे नाव कसे मिळाले असावे या संदर्भात कन्नड भाषेतील 'गुड्ड हिंग्लज' म्हणजेच हिंग्लाज देवीचा डोंगर अशी व्युत्पत्ती सांगीतली जाते. या गावचे ग्रामदैवत कल्लेश्वर असून मातृदेवता महालक्ष्मी आहे. तिचा माही उत्सव दर बारा वर्षातून एकदा अतिशय मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.

## अ) हिंगलजाई (महालक्ष्मी) नामस्वरूप व मंदिर :-

गडहिंग्लज शहराच्या मध्यवस्तीत एका तिङ्ट्यावर बाजार-व्यापारी पेठेतच गडहिंग्लजची मातृदेवता महालक्ष्मीचे मोठे मंदिर वसलेले आहे. साधारणत: १० गुंठे क्षेत्राच्या परिसरात हे मंदिर वसलेले आहे. मंदिराच्या अवतीभोवती आवारतच आठवडी बाजार भरतो. त्यामुळे मंदिर परिसरात मोठी वर्दळ असते. गडहिंग्लजच्या पंचक्रोशीतून आठवडी बाजारास येणारे खेड्यातील शेतकरी, व्यापारी येथील बाजाराला सुद्धा महालक्ष्मीचा बाजार असेच म्हणतात. गडहिंग्लजच्या महालक्ष्मी मंदिराच्या गर्भगृहातील मुर्ती संगमरवरी दगडाची व रंगवलेली असून तिचे रुप महिषासूरमर्दिनी असे आहे. सदरची मुर्ती सन १९४५-४५ सालापूर्वीच बसविलेली असल्याचा उल्लेख पश्चिम महा. देवस्थान समितीच्या सर्व्हे रिपोर्टमध्ये आहे. अष्टभूजा असणाऱ्या या मुर्तीत दुर्गेने महिषासुराला

पायाखाली घेतलेले असून त्याच्याशी युद्ध करीत आहे. मुंडके तुटलेल्या रेड्याच्या मानेतून महिषासूर बाहेर पडल्याचे दर्शविले आहे. मुर्तीच्या मागिल बाजूस चांदिची प्रभावळ आहे. मुर्ती एका उंच दगडी जोत्यावर असून त्याच्या खालील बाजूस महालक्ष्मीचा तांदळा आहे. येथील मंदिरात संगमरवरी महिषासूरमर्दिनी दुर्गेची मुर्ती असूनही या देवीस महालक्ष्मी असेच म्हणण्याचा प्रघात आहे. वास्तविकत: हे मंदिर महालक्ष्मीचे नसून महिषासूरमर्दिनी, दुर्गा अर्थातच गावच्या नामबरहुकूम हिंगलजाईचे आहे. कोल्हापूर जिल्ह्याच्या दक्षिणेतील तालुक्यात गावो-गावी असणाऱ्या महिषासूरमर्दिनी मातृदेवतेला 'लक्ष्मी' असेच म्हणण्याचा प्रघात आहे. नामोच्चाराच्या दृष्टीने ते सोपे असल्याने व आपल्या समृद्धीस कारणीभूत असणाऱ्या या देवीस ते लक्ष्मीच म्हणतात. तसेच माघ महिन्यात त्यांच्या यात्रा होत असल्याने यात्रांना माघी = 'माही' असेच म्हणतात.

गडहिंग्लजवासियांची रक्षक व समृद्धी देवता सुद्धा 'लक्ष्मीच' होय. वैदिकीकरणाच्या लाटेत तीला महालक्ष्मी बनविण्यात आले. नागरी संस्कृतीशी आलेला संबंध व मंदिराचा वाढता विस्तार यातूनच या हिंगलजाईचे, लक्ष्मी व पुढे महालक्ष्मी असे नामकरण होत गेले. इथल्या भक्त-जाणकारांनी सांगितल्यानुसार महालक्ष्मीचे मुळ ठाणं हरळी बुद्रुकच्या डोंगरावरती आहे. तिथे ती गुड्डाई म्हणजेच डोंगराई या नावाने पूजली जाते. हिच हिंगलजाई होय. हरळी बुद्रुक गावातील मंदिरात मात्र तिची पूजा महालक्ष्मी म्हणून केली जाते. हरळी बुद्रुक हे महापाषाणयुगीन काळापासूनचे ठिकाण असल्याचे पुरातत्त्व संशोधकांनी सिद्ध केले आहे. तेथे महापाषाणयुगीन पुरावशेष सापडलेले आहेत. गडहिंग्लज व हरळी बुद्रुक ह्या दोन्ही ठिकाणी महापाषाणीयांचा संपर्क असावा. परंतु महापाषाणीय जन या हिंगलाईचे उपासक नसावेत, महापाषाणीय व आद्य द्रविड हे गुण्यागोविंदाने या आद्य खेड्यात शेजारी शेजारी रहात असावेत.

हिंगलजाई मंदिराची रचना एक गर्भगृह व त्याच्या समोर कौलारू मोठा सभामंडप अशी आहे. मंदिर पूर्वाभिमुख असून गर्भगृहावरती उंच असे दाक्षिण्यात्य शैलीतील शिखर आहे. शिखरावरती अनेक देवी-देवतांच्या मुर्त्या कोरलेल्या आहेत. सन १९६२ साली मंदिराचा जिर्णोद्धार झाला त्यावेळी मंदिराची रंगरंगोटी व चित्रावली भै. रा. कुभार, ग. भै. कुंभार व ब. ज. मोमीन यांनी केली असल्याचे शिखरावरती कोरलेले आहे. सन २००१ साली मंदिराचा पुन्हा जिर्णोद्धार महालक्ष्मी मंदिर यात्रा कमिटी यांच्याकडून समाजाच्या विविध थरातील व धर्मातील लोकांच्या देणगीतून झाल्याची स्मारक शिळा सभामंडपात लावण्यात आली आहे. मंदिर येथे केव्हा निर्माण केले गेले याची मात्र कोणतीही नोंद नाही. मात्र मंदिराच्या पूजाऱ्यांकडून हे मंदिर यदू बाळू कुंभार, भैरू बाळू कुंभार यांनी बांधल्याचे सांगितले जाते. देवीचा वार मंगळवार व शुक्रवारी देवीस अभिषेक घातला जातो. या व्यतिरिक्त गुढीपाडवा, होळी, अक्षयतृतीया, दिपावली व बेंदूर इ. सणाप्रसंगी विशेष आरत्या व देवीची पूजा केली जाते. स्त्रीया देवीची या प्रसंगी खणा नारळाने ओटी भरतात. देवीस हिरवा चुडा अर्पण करतात. इथल्या शहरी बहुजन वर्गावर देवीविषयी अपार श्रद्धा आहे.

### ब) महालक्ष्मीची दैवतकथा व ऐतिहासिकत्त्वाचा शोध :-

'महालक्ष्मी' ची एक दैवतकथा गडहिंग्लजच्या पंचक्रोशीत अतिशय सुप्रसिद्ध असून महालक्ष्मीच्या यात्रेशी संबंधीत आहे. ती कथा अशी , एका ब्राह्मण दांम्पत्याच्या पोटी लक्ष्मी जन्म घेते. वास्तविकत: ती सटवाईचीच मुलगी असते. तिचे भविष्य सटवाईने लिहून ठेवलेले असते. त्यामुळेच तिला घराबाहेर लहानपणापासूनच पडू दिले जात नाही. ति मोठी झाल्यानंतर जग पाहण्यासाठी घराबाहेर पडते, तेव्हा ती एका अत्यंत बुद्धीमान व रूबाबदार माणसाच्या प्रेमात पडते त्याच्याशीच विवाहाचा निश्चय करते. आईवडील विवाहास संमती देतात पुढे त्यांना एक मुलगा होतो. त्याचे नाव 'इंगळोबा' असे ठेवतात. इंगळोबा थोडा मोठा झाल्यावर आपल्या पित्याच्या सतत मागे लागतो. पित्याला कामात हातभार लावतो. एके दिवशी इंगळोबाच्या हातात काही चामड्याच्या वस्तू लक्ष्मीला दिसतात तेव्हा लक्ष्मीला थोडी शंका येते. त्याचा बाप नेमका कोणत्या जातीतील असावा? अशी तिच्या मनात शंका उत्पन्न होते. एके दिवशी इंगळोबा त्याच्या पिताच्या कामाच्या ठिकाणी निघालेला असतो. तेव्हा त्याच्या मागोमाग लक्ष्मी जाते. आपल्या पाठीमागून आई येत आहे हे दिसताच तो धावत धावत आपल्या पित्याकडे जाताच त्याचा पिताही आपले खरे स्वरूप कळेल म्हणून तोही धावू लागतो. धावत धावत तो रेड्याच्या गुद्द्वारात प्रवेश करतो. तेव्हा लक्ष्मी लगेच त्या रेड्याचा शिरच्छेद करते व त्या चर्मकाराचे मुंडके रेड्याच्या छाटलेल्या मुखातून बाहेर काढते.[२]

लक्ष्मीची हि दैवतकथा महिषासूर वधाच्या कथानकाशी एकरूप साधणारी असून प्रतिलोम विवाहाद्वारे झालेला वर्णसंकरही निर्देशीत करते. अशाच आशयाच्या दैवतकथा संपूर्ण दक्षिण भारतात प्रचलित आहेत. या कथानकाचे ऐतिहासिकत्त्व सातवाहन घराण्याच्या उत्पत्तीकथेशी अथवा प्राचीन 'भोज' राजघराण्याच्या नाशाशी जोडता येईल. प्रबंधचिंतामणी नावाच्या जैन ग्रंथात सातवाहनांच्या उद्‌गमाची कहाणी संक्षेपाने पुढील प्रमाणे येते,

एक ब्राह्मण कन्या कुंभ घेऊन नागडोहावरून पाणी आणत असते. तेथे शेषराज तीला पाहतो व तिच्याशी लग्न करतो. ब्राह्मणकन्या गरोदर झाल्यावर भावांना ही बाब समजते व ते तिला सोडून देतात. मग ती कन्या एका कुंभारवाड्यात

आश्रय घेते. पुढे तिला झालेला मुलगा म्हणजे बाल सातवाहन/शालवाहन वा सातकर्णी होय. नंतर उज्जैनचा राजा विक्रमादित्य याने हल्ला केल्यावर बालसातवाहन मातीच्या मूर्तीवर पाणी शिंपडून विहिरींमधून बाल सैन्याची निर्मिती करतो.[३] जैन लेखक जीनप्रभसुरी याने आपल्या "कल्प प्रदिप" या ग्रंथात अशीच कथा सांगितली आहे.

या कथानकातील ब्राह्मणकन्या, शेषराज, कुंभारवाडा, बालसातवाहन (इंगळोबा) इ. दुवे गडहिंग्लज येथे आढळणाऱ्या लक्ष्मीच्या कथानकाशी साम्य दर्शवतात. अनेक शतके अनेक पिढ्यांनी आशय न बदलू देता ते मुखोद्गत ठेवलेले आहे. परंतु सातवाहनांच्या पूर्वी कित्येक शेकडो दशके आधी विंद्य पर्वताच्या दक्षिणेस होऊन गेलेल्या 'भोज' राजवंशाच्या नाशाशी या कथानकाचा उगम दर्शवतो. मौर्य सम्राट अशोकाच्या शिलालेखात एक प्राचीन राजवंश म्हणून भोजांचा उल्लेख आला आहे. रघुवंशात कालिदासाने विदर्भाच्या राजाला भोज असे म्हटले आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात पुढील वेचा आलेला आहे[४]. ***'दाण्डकयो नाम भोजः कामाद ब्राह्मणकन्यामभिम न्यामानः संबंधुराष्ट्रो विननाश।'***

(दाण्डक्य नावाच्या किंवा दण्डकाचा राजा असलेल्या) भोजाने एका ब्राह्मणकन्येवर हात टाकल्यामुळे तो आपल्या ज्ञातिबांधवासह आणि राज्यासह नाश पावला) 'अर्थशास्त्रातील' हा पुरावा अश्वघोषाच्या 'बुद्धचरिताने' समर्पित झाला आहे. भोजांप्रमाणेच कराल वैदेहाच्या बाबतीतही हेच घडले. कराल जनकाने जेव्हा ब्राह्मण कन्येचे अपहरण केले, तेव्हा त्यामुळे तो जातिभ्रष्ट झाला, पण त्याने आपले प्रेम सोडले नाही. परंतु पुढे राज्य व ज्ञातिबांधवासह नाश पावला. त्यानेच विदेह राजवंशाची समाप्ती केली. वैदेह हाच कलार (कराल) होय. विदेह राजवंशाच्या अशा प्रकारच्या विनाशाप्रमाणेच वा अपकृत्यामुळे रोममधून ज्यांना घालवून दिले त्या तार्क्विनांच्या दुर्दशेची आठवण होते. जसे रोममध्ये घडले, तसेच विदेहामध्ये घडले [५]. हेमचंद्र रायचौधुरी यांच्यामते, "नमी आणि कराल या उत्तरकालीन वैदाहांच्या काळातच मुळी आर्यांनी विंध्य ओलांडला आणि रेवा (नर्मदा) येथपासून गोदावरी पर्यंतच्या प्रदेशामध्ये अनेक राज्ये स्थापली होती." आर्यांचे हे आगमन अश्मक मार्गे पौंडित्य ऋषीच्या नेतृत्त्वाखाली झाले असावे. महिषासुर खरा कोण होता? या लेखात सुरेश जोशी यांनी, "इंद्रनिष्ठ गटाच्या या कपटनितीचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे सुरुवातीच्या काळात इंद्रनिष्ठ अल्पसंख्य व सामर्थ्यहीन होते. या युद्धनिती शिवाय त्यांच्यापुढे पर्याय नव्हता. उलट असुर हे प्रबळ, सामर्थ्यसंपन्न होते." ब्राह्मणकन्या अर्थात अप्सरा हा युद्धनितीचा भाग या कथानकात असावा. दुर्गेला अर्थात महिषासूरमर्दिनीला विंध्यवासिनी असे म्हटले जाते. गडहिंग्लजची लक्ष्मी ही महिषासुरमर्दिनी स्वरूपच आहे. ती लक्ष्मी ब्राह्मण व अनार्य भोज कराल यांनी केलेल्या राक्षस विवाह वा वर्णसंकरामुळे झालेल्या आर्य-अनार्य संघर्षाचे ऐतिहासिकतत्त्व सिद्ध करते. या ऐतिहासिक संघर्षाला आर्यांनी पौराणिक रंग चढवून दुर्गासप्तशती, श्रीदेवीभागवत या उपपुराणांची रचना वरील ऐतिहासिक घटेनेला केंद्रिभूत ठेवून केली.

डॉ. द. ता. भोसले यांनी दिलेल्या एका वंश व्युत्पुत्तीनुसार[६] महिष हे एका प्राचीन राजवंशाचे नाव आहे. हा राजवंश कर्नाटकात राज्य करीत होता. उत्खननात मिळविलेल्या नाण्यांवर महिष नाव कोरलेले आहे. त्यावरून कदाचित म्हैसूर हे नाव तयार झाले असावे. महिष म्हणजे रेडा होय. या राजवंशाचे देवक रेडा असल्यामुळेच या राजवंशाला महिष हे नाव प्राप्त झाले असावे. या राजवंशाला असुर म्हणून ओळखले जात होते. महिषासूर हा कदाचित या असुरांचाच राजा असावा. त्याचेच देवीशी युद्ध झाले असावे म्हणजे रेडा आणि असूर या दोन्ही कल्पना एकजीव झालेल्या असाव्यात. कारण महिषासुराचे चित्र आणि मुर्ती यामध्ये त्याचे शरीर रेड्याचे आणि डोके असुराचे असते असा उल्लेख इतिहासाचार्य राजवाडे यांनी एका लेखात केलेला आहे. या दोन्ही कल्पना एकत्त्वाची खूण म्हणावी लागेल. प्राचीन भारतात चुटूकुलक घराण्याने ज्या प्रांतावर राज्य केले त्या प्रांतास महिषदेश असे म्हटले जाई.

सातवाहन घराण्याच्या व्युत्पत्ती संदर्भात आपण जी वर एक कथा पाहिली त्या कथेशी थोडीशी विसंगत परंतु आशय चौकटीला धरून गुणाढ्याने बृहत्कथेत एक व्युत्पत्ती दिली आहे. ती अशी[७], "पूर्वी दीपकर्णी नावाचा मोठा पराक्रमी राजा होता. त्याची शक्तीमती नावाची प्रिय भार्या होती. एकदा विषयोपभोग भोगून उद्यानात निजली असता तिला साप चावला त्यामुळे ती साध्वी मरण पावली. आपत्यहिन राजा दुःखी झाला. त्याने ब्रह्मचर्य व्रत धरिले. तेव्हा भगवान शंकर राजाच्या स्वप्नात येऊन म्हणाले, "राजा तू महाअरण्यात जाऊन भ्रमण करीत रहा. तेथे जो सिंहावर बसलेला कुमार दिसेल त्याला तु घेऊन ये. तो तुझा पुत्र होईल." राजाला मोठा आनंद झाला. दुसऱ्या दिवशी तो अरण्यात गेला तेथे त्याला सरोवराच्या तिरावर सिंहावर बसलेला सुर्यासारखा तेजस्वी बालक दिसला. तो बालक सिंहाच्या पाठीवरून खाली उतरून जलाच्या अभिलाशेने तलावात उतरताच राजाने त्यास बाणाने मारिले. त्याबरोबर सिंहाचे शरीर सोडून तो पुरुषाच्या आकाराचा झाला. राजाने त्याची पृच्छा करताच, "मी कुबेराचा सात नावाचा यक्ष आहे. एकदा मी गंगेत स्नान करीत असता ऋषीकन्येस पाहिले तेव्हा आम्ही दोघेही कामवश झालो. गांधर्वविधीने मी तिचे पाणी ग्रहण केले. जेव्हा तिच्या घरच्यांना जेव्हा हे कळाले तेव्हा त्यांनी क्रोधाने, 'अरे पाप्यांनो, तुम्ही दोघेही स्वेच्छाधारी सिंह व्हा असा शाप दिला आम्ही पुष्कळ प्रार्थना कल्यावर, 'पुत्र होईपर्यंत तु सिंही होऊन राहशील व दीपकर्णीचा बाण लागेपर्यंत तो यक्ष सिंहयोनीत राहील.' असा उःशाप दिला. आत तुमच्या कृपेने मी शापापासून मुक्त झालो आहे. आता हा बालक तुला देतो. त्याचे तु रक्षण कर." इतके

सांगून तो यक्ष गुप्त झाला. राजा त्यास घरी घेऊन आला. 'सात' यक्षाने त्यास पाठीवरून वाहिल्यामुळे त्यास सातवाहन नाव मिळाले. राजाने त्याचा राज्याभिषेक करून वानप्रस्थाश्रमास गेला." गुणाढ्याच्या या कथेचे सुत्र सुद्धा महिषासुराच्या कथेच्या मध्यवर्ती सुत्रांशी बांधील आहे. इथे मात्र रेड्याऐवजी सिंहाला बळी जावे लागते. अशीच कथा कथासरित्सागरात गुणाढ्याची जन्मकथा म्हणून दिली आहे. कथासारितसागर या ग्रंथाचा लेखक सोमदेव (इ. स. १२ वे शतकात) याने ही अशीच कथा आपल्या ग्रंथात दिली आहे.

तांत्रिक उपासकांच्यामध्ये सुद्धा एक कथा प्रचलित आहे. एका वामदत्त ब्राह्मणाची स्त्री शाकिनीच्या साह्याने बिघडली आणि मांत्रिक बनली. तिने आपल्या नवऱ्यास रेडा बनविले. दुसऱ्या एका मांत्रिक स्त्रीने ते पाहिले आणि त्याला रेडेपणापासून सोडवून मानुष्य परत दिले. आणि त्याला आपली मुलगी देखील दिली अशा प्रकारची कथा अरेबियन नाईट्स मध्ये सुद्धा आली आहे.[८] श्रीदेवी भागवताच्या पाचव्या स्कंधातील दुसऱ्या अध्यायात महिषासुराच्या जन्माची कथा आली आहे. दान व श्रेष्ठ दस्यूचा पुत्र रंभ याला अग्नीच्या वरामुळे त्रैलोक्य विजयी व इच्छेप्रमाणे रूप बदलू शकणारा पुत्र झाला. रंभाला एका वनात यक्षांनी वस्ती केलेल्या, महिषी (म्हैस) (यक्षिणी) पासून कामविव्हलामुळे गर्भ राहिला. परंतु कामातूर महिषा (रेडा) पासून तिला त्रास होऊ लागल्यावर रंभाने तिला पाताललोकात (बहुधा दक्षिण) नेले. परंतु महिषा तेथेही आला व रंभाला आपल्या तिक्ष्ण शिंगाने ठार मारले. पती मृत झाल्याचे पाहून गर्भवती महिषी सैरावैरा पळू लागली. अति काम विव्हल महिष तिच्या मागे लागला. अशा वेळी सर्व यक्ष तिच्या मदतीस धावले. यक्षांचे व महिषांचे युद्ध झाले. यक्षांच्या बाणांनी जखमा होऊन महिष भूमीवर पडला व मृत्यू पावला. इकडे मृत रंभाला चितेवर देहशुद्धीसाठी ठेवल्यावर आपल्या पतीबरोबर तिने अग्निप्रवेश केला परंतु तेव्हा तिच्या गर्भातून महाबलाढ्य महिषासूर बाहेर पडला. पुत्र प्रेमाने रंभाही रक्तबिज नावाने बाहेर पडला. पुढे त्या महापराक्रमी महिषासूराला दैत्यांनी राज्यभिषेक केला[९]. यातही कथासुत्र एकच आहे. दानवकुळातील रंभासुर व यक्षकुळातील महिषी या भिन्न वर्णीयांच्या राक्षस विवाहातून महिषासुराचा जन्म येथे दर्शवला आहे. परंतु या रंभाचा वध एका महिष अर्थात रेड्याच्या हातून दर्शवला आहे. महिषीच्या हातून नव्हे. जसे लक्ष्मीला व चाळोबाला कुंभारवाड्यात आश्रय मिळाला तसा यक्षांनी त्यांना आश्रय दिला

श्रीदेवी भागवतानुसार पुढे महिषासुराने आपल्या सामर्थ्याने त्रैलोक्य जिंकून घेतले. देवांचाही पराभव केला. इंद्र रणांगण सोडून पळून गेला. महिषासुराने कठोर तप करून "मनुष्य व दैत्ययोनीतील पुरुषापासून मृत्यू येऊ नये. कोणीही स्त्री माझा वध करण्यास समर्थ नसल्यामुळे मला स्त्री पासून मरण दे" असा वर मिळविला होता. त्यामुळे सर्व देवांचा पराभव करून पळवून लावले. सर्व देव शेवटी विष्णूकडे गेले. विष्णूच्या सल्ल्यानुसार सर्व देवांच्या महातेजातून सौंदर्य संपन्न व महातेजस्वी स्त्री निर्माण झाली. त्या अठराभुजा देवीस देवांनी आपली आयुधे दिली. आता दुर्गा महिषासुराच्या वधास सिद्ध झाली. परंतु महिषासुर देवीवर मोहित होऊन म्हणाला "हे सुंदरी मी तुला माझी पट्टराणी करीन. मी तुझा दास होऊन देवांशी वैर करण्याचे सोडून देईन. तुला ज्यात सुख वाटेल ते मी करीन तेव्हा तु आज्ञा कर. तुझ्या रुपाने माझे चित्त मोहित झाले आहे." तेव्हा देवीने त्यास नाकारून युद्धास सज्ज झाली. देवीने युद्ध करुन भुजंगतुल्य बाणांनी त्याचा वध करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा सिंहरूप टाकून महिषाने मदोन्मत हत्तीचे रूप धारण केले आणि सोंडेने एक महाभयंकर पर्वत शिखर उपटून त्याने देवीवर फेकले. परंतु देवीने आपल्या बाणदृष्टीने त्याचे तिळमात्र तुकडे केले. तेव्हा देवीच्या सिंहाने गजरूपी महिषाच्या मस्तकावर उडी मारून नखाने त्याचे गंडस्थल विदीर्ण करून टाकताच त्याने गजरूप सोडून महिषरूप धारण केले. शेवटी देवीने चक्राने महिषाचे मस्तक धडावेळे केले.[१०] द्वारशिल्पावरती गंड-भेरूंड व गज-सिंहाची जी शिल्पे आढळतात त्याची पौराणिकता या कथेत असावी.

श्री दुर्गा सप्तशतीमध्ये सुद्धा अशाच प्रकारचे कथानक असून यामध्ये फक्त देवीने रेड्याला पायात दाबून त्याच्या मुखातून बाहेर पडणाऱ्या महिषासूराचे मस्तक तलवारीने धडावेगळे केले असल्याचे नमूद केले आहे.[११] मार्कंडेय पुराणानुसार रंभ नावाच्या दैत्याचा एक मुलगा म्हणून महिषासूर प्रसिद्ध होता. त्याचा आकार रेड्यासारखा होता. ब्रह्मांडपुराणात महिषासुर रसातलात राहत असे, असा उल्लेख आहे. तारकासुराच्या या सेनापतीने आपल्या रथाला उंट जुंपले होते, असे मत्स्यपुराणात म्हटलेलं आहे. याच ग्रंथात त्याने कुबेरावर सावित्री या अस्त्राने आक्रमण केलं होत, तसेच निर्ऋती व वरूण यांना पराजीत करून कुज्मभाला पाशमुक्त केल होतं, असा उल्लेख आहे.

ब्राह्मणपुराणातील कथेनुसार महिषासुराने सर्व देवांना पराजित केलं, तेव्हा ते ब्रह्मदेवाकडे गेले. त्या सर्वांना घेऊन ब्रह्मदेव विष्णूकडे गेला. कोणत्याही पुरुषाकडून महिषासुर मारला जाणार नाही, असा त्याला वर होता. त्यामुळे सर्व देवांनी विष्णूच्या आदेशानुसार आपआपलं तेज काढलं. त्यातून एक तेज:पुंज स्वरूपातील देवी प्रकट झाली व तीने महिषासुराला मारलं. याकथेतून सर्व देवांच्या मदतीने देवीला शक्ती मिळाली, अस सूचीत करण्यात आलेल आहे. महिषासुराला मारल्यामुळे महिषासुरमर्दिनी हे नाव दुर्गेला मिळालं, असं मानतात. परंतु तिला दुर्गा हे नाव का मिळाल? याच स्पष्टीकरण स्कंदपुराणातील काशीखंडाच्या उत्तरार्धात आलेल्या कथेनुसार, रुरुचा पुत्र महादैत्य दुर्ग याने देवांना त्रासवून सोडल होतं.

तेव्हा शिवाने त्याला मारण्याकरिता देवीला पाठवलं, तिने दुर्ग या दैत्याला मारलं म्हणून तिला दुर्गा असं नाव प्राप्त झालं. इ. स. दुसऱ्या शतकात रचण्यात आलेल्या महाभारतात दुर्गा ही देवता सर्वप्रथम आढळते. या महाकाव्यात महिषासुराने दुर्गेशी लग्न करण्याची इच्छा प्रकट केली, अस वर्णन आहे. तिच्या रूपसौंदर्यावर तो भाळला होता. देवीने अशी अट टाकली होती की, जो युद्धात तीला हरवील त्याच्याशीच ती लग्न करील. महिषासुर युद्धासाठी तयार झाला. दोघांमध्ये घनघोर युद्ध झाल. सर्व देवांनी देवीला मदत केल्यामुळे महिषासुराचा पराभव झाला.[१२]

## क) महिषासुर कोण होता ?:-

महिषासुराच्या वास्तव स्वरूपाचा शोध घेताना प्रा. डॉ. अशोक राणा म्हणतात, "दिती या मातृदेवतेचे पुत्र या अर्थाचा दैत्य हा शब्द आहे. म्हणजेच महिषासुराने ते गौरवाने आपल्या नावाआधी लावलं असावं. असुर या शब्दाचा अर्थ 'प्राणरक्षकविद्या ज्याने आत्मसात केली आहे तो', असा होतो. तसेच राक्षस म्हणजे रक्षण करणारा. थोडक्यात, प्राणरक्षकविद्या आत्मसात केलेला, सर्वांचा रक्षण करणारा दितीचा पुत्र महिषासुर, असं त्याच वर्णन करता येईल. दितीचा पुत्र हिरण्याक्षाचा तो मुलगा, असाही त्याचा उल्लेख काही ठिकाणी येतो, यावरून तो दितीचा नातू असावा, असे दिसते. परंतु मातृसत्ताक समाजाची खूण दैत्य असं विशेषण तो गौरवाने मिरवित असावा." पंडित श्री. दा. सातवळेकरांनी 'रक्षकांचे राक्षस' या लेखात प्रजापतीने प्रजा उत्पन्न केली. त्यावेळी जनतेच्या रक्षणाचे पवित्र कार्य ज्यांनी स्वेच्छेने स्विकारले त्यांचे नाव राक्षस (रक्षक) असे होते. हे स्वयंसेवकच होते. आपले (असु) प्राण जनतेच्या रक्षणासाठी (रा) अर्पण करीत असत. म्हणून यास 'असु-र' अर्थात जीवन अर्पण करणारे असे म्हटले आहे. ते सुरा घेत नसत म्हणून त्यांना (अ-सुर) असेही म्हणत. अर्थात महिषासुर असुर होता असे स्पष्टीकरण महिषासूर खरा कोण होता? या लेखात श्री. सुरेश जोशी यांनी केले आहे.[१३] इतिहासाचार्य राजवाडे यांनी "आमची पुराणे व असीरियातील नवे शोध" या लेखात,

*"अश्शुर, Asshur, असूर, असुर हे लोक वर्तमान तैग्रिस नदीच्या व Babylonia च्या उत्तर प्रदेशात राहणारे लोक. त्यांनी निनेव्हे येथे इ. स. पू. १८३० पासून इ. स. पू. ५३८ पर्यंत राज्य व पातशाहत केली. ह्या पूर्वी हे लोक स्वतंत्र राज्य करून नव्हते, Babylonia च्या अमंलाखाली होते. Semetic Babylonians चे हे संबंधीच होते. परंतु वंशाने शुद्ध Semetic होते. हे असुर लोक धिप्पाड बांध्याचे असत. शत्रुंशी त्यांचे वागणे अत्यंत क्रुर तऱ्हेचे व बीभत्स असे. भारतीय पुराणातून व इतिहासातून त्यांची वर्णने आढळतात. त्यांचा युरोपियन इतिहासकारांनी केलेल्या वर्णनात तंतोतंत मेळ बसतो. तेव्हा असुर्या देशातील हे असूर लोक पुराणातील व इतिहासातील असूर होत, यात बिल्कुल संशय नाही."*

या असूरांचा वंश Semitic होय. ते पुढे स्पष्ट करतात, "इ. स. पू. १८३० मध्ये निनेव्ह येथे राज्य स्थापन करण्यापूर्वी इ. पू. ७००० पर्यंत हे लोक लहान-सहान संस्थाने करून Babylonia च्या Sumerian आर्य व Semitic राजांच्या अमंलाखाली असताना भारतवर्षात हे लोक (Semitic -असुर) आले असावेत." हे असुर भारतात केव्हा आले असावेत या संदर्भात ते म्हणतात, इ. स. पू. १८३० च्या पूर्वी Babylonia Semitic राज्य असताना, हे असुर लोक भारतवर्षात आले असल्याचा बळकट संभव आहे.[१४] Semitic असूर व Summerian आर्य यांच्यातील संघर्षातून पुढे Babylonia येथे Summer नावाच्या आर्य लोकांचे इ. स. पू. ६००० ते इ. स. पू. ४५०० पर्यंत राज्य होते. अनेक इतिहास संशोधकांनी सिद्ध करून दाखविले आहे की, सुमेरियन मातृदेवता सिंहवाहिनी इनान्ना व भारतीय दुर्गा या एकच होत. त्याचप्रमाणे प्राचीन अनातोलिया (ग्रीक संस्कृतीपूर्व) म्हणजेच रशियातील तुर्कस्थानामधील अर्थातच आर्यांचे मुळ वसतीस्थान आशिया मायनर (बोधाझकोई) मधील नवाश्मयुगीन सिंहयुक्त मातृदेवतेशीही तिचं नात जोडल जात. 'सिंह' हे कुलचिन्ह मातृदेवतेशीही तिचं नात जोडल जात. सिंह हे कुलचिन्ह (Totem) असणारा आर्य समुह (अन्न संग्राहक वा मृगया) आणि शेतीस उपयुक्त असणारा प्राणी 'रेडा' कि ज्याचे ते कुलचिन्ह होते ते अनार्य (Semitic) यांच्यातला मोठा संघर्ष होता. पुढे महाभारतात दुर्गा हि पांडवांची मातृदेवता असल्याचे म्हटले आहे.

## ड) हिंगलाजदेवी : अनातोलियन सिंहवाहिनी 'शताल हूयूक',सुमेरियन इनान्ना ते बॅबिलोनियन 'इश्तार' :-

सिंहवाहिनी दुर्गा अर्थात गडहिंग्लजच्या महालक्ष्मीचे मुर्तीविज्ञान महिषासुरमर्दिनी स्वरूप असून ती हिंगलजाई नावाने विख्यात आहे. या हिंगलजाईचे मूळ आजच्या पाकिस्तानातील बलुचिस्तानमध्ये असल्याचे येथील मंदिराचे कुंभार-गुरव व मानकरी सांगतात तिच्यावरूनच शहराला गडहिंग्लज हे नाव मिळाल्याचे अभिमानाने सांगतात.

तंत्रचूडामणी या संस्कृत ग्रंथात, "पर्वत राजाने आपला यज्ञ समारंभ हिंगलाज पर्वतावरच केला होता. पार्वतीने आपल्या पतीचा अपमान झाल्यावर तेथीलच यज्ञ अग्नकुंडात अग्निप्रवेश केला होता त्यानंतर तीचे मृत शरीर भगवान शंकर घेऊन जात असताना भगवान विष्णूने तिच्या शरीराचे तुकडे केले त्यापैकी 'ब्रह्मरंन्ध्र' हा अवयव जेथे पडला ते क्षेत्र म्हणजे

हिंगलाज पर्वत होय. ५१ शक्तीपीठातील हे एक शक्तीपीठ होय". तेथे आजही भैरवभिमलोचन व हिंगलाज देवीची पूजा होते.

*ब्रह्मरन्ध्र हिंगुलायां भैरवो भमलोचनः ।*
*कोट्टरी सा महामाया त्रिगुणा या दिगम्बरी ।।*

आजच्या पाकिस्तान देशातील बलुचिस्तान प्रांतात २५°.३०' अक्षांश व ६५°.३१' रेखांशावर अरबी समुद्रापासून २० मैल आत मकरान पर्वत रांगातील एका ज्वालामुखीच्या उगमाजवळील नैसर्गिक गुंफेत हिंगलाज देवीचे स्थान आहे. या पर्वतास हिंगुली पर्वत असेही म्हणतात. सैंधव संस्कृतीतील हिंगुळी पर्वत तोच होय. समुद्रसपाटीपासून त्याची उंची ३,७०९ फूट इतकी आहे. तेथील स्थानिक मुस्लिम भक्त तिची पूजा करतात. तिला 'नानी' असे म्हणतात. तर तेथील तिर्थयात्रेला 'नानीका हज' असे म्हणतात. भक्तांना तेथे पापपुण्याचा पाढा वाचावा लागतो. तेथील हिंगला देवीची पूजा अत्यल्पसंख्य हिंदूच्या बरोबर बलुचिस्तानातील मुस्लिम मोठ्या प्रमाणात करतात. लाल कापड, अगरबत्ती, मेणबत्ती आणि सिरणी देवीस अर्पण करतात. तेथील अख्यायिकेनुसार सती पार्वतीला न सांगता गुप्तस्वरूपात भगवान शंकर येथे निवास करीत असता पार्वतीने हिंगलाज स्वरूपात त्यांना शोधून काढले व हे स्थान तिच्या नावाने तिर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्धिस आले. कराची शहरापासून ६ मैल दूर 'हाव' नदीच्या पलीकडे मकरान पर्वतमाला असून तेथे जाण्यासाठी कराची शहरातूनच पायी जावे लागते. वाटेत मरूस्थल (वाळवंट) असून ६ दिवसांच्या पायी प्रवासानंतर तेथे पोहचता येते. मकरान पर्वतावर चढून गेल्यावर चंद्रकूप नावाचा ज्वालामुखी लागतो. तेथून काही मैल अंतरावर अघोर नदी लागते. त्याच्या पुर्वेकडील खनिजयुक्त डोंगराच्या माथ्यावरील नैसर्गिक गुहेत हिंगलाज देवीचे स्थान आहे. या प्रचंड आकाराच्या अजस्त्र गुहा यक्षांनी बनविल्या आहेत, असे येथे भक्तीभावाने सांगितले जाते. या गुहेतूनच अखंड वाहता झरा आहे. येथील लोकांची अशी धारणा आहे की, आसामची कामाख्या, तामिळनाडूची कन्याकुमारी, कांचीची कामाक्षी, गुजरातची अंबादेवी, प्रयागची ललिता, विन्ध्याचलची गुह्येश्वरी आणि माळव्याची कालिका या बारा रूपात आद्याशक्ती हिंगलादेवी सुशोभित आहे.[१५] श्री नवनाथ भक्तीसार या ग्रंथातील चौथ्या अध्यायात मच्छिंद्रनाथ व हिंगळादेवी यांची भेट झाल्याचे वर्णन आले आहे. ते ठिकाण बलुचिस्तानातील मकरान पर्वतमालेतील हिंगुलजा पर्वत हेच असावे.

प्रा. डॉ. पु. नी. फडके यांनी या हिंगलाजदेवीचे उपासक कोण? व तिचे नामस्वरूप काय होते? या संदर्भात शालीवाहन राजवंश या ग्रंथात के. आर. मकलानी यांचा संदर्भ देताना विवेचन केले आहे,[१६] "पणी हेच आजच्या सिंधी समाजाचे पूर्वज होत. मौर्यकाळात व्यापार वृद्धी झाली होती. दक्षिणेत नव्याने व्यापार सुरु झाला होता. दक्षिण पूर्व आशियातील सफरीमुळे त्यात सतत भर पडत होती. या सर्व परिस्थतीत पणी लोक सहज सामावून गेले. याचे एक उदाहरण हिंगलाज देवीच्या पुजेचे आहे. हिचे मूळ रूप सिंहला म्हणजे सिंहवाहिनी दुर्गा या अर्थाने आहे. सिंधी भाषेत 'स' चा 'ह' होतो. सिंधमध्ये कराचीच्या पश्चिमेस डोंगरात मूलस्थान असलेली ही देवी सातवाहन काळात पश्चिम भारतात पूजीली जात होती. अलिबाग जवळ चौल, चिपळून जवळ विंध्यवासिनी, नाशिक जवळ सप्तशृंगी, कोल्हापूरजवळ गडहिंग्लज, मराठवाड्यात हिंगोली तर मध्य प्रांतात हिंगलाजगड या सर्व स्थानी तिची पूजा होते. महाबलीपूरम येथेही तिचेच शिल्प आहे. हा सर्व पुरावा 'पणी फोनेशियन' भारतीय समाजात विविध जातीच्या रुपात सामावून गेले असे दर्शवतो." या त्यांच्या विवेचनावरून सिंहला देवीचे (सिंह वाहन युक्त) 'हिंगला' होऊन सिंधू संस्कृतीतील पणी अर्थात आजचे 'सिंधी' हे तिचे भक्त असून सातवाहन काळात (इ. स. पू. २५० ते इ. स. २५०) पश्चिम भारतात तिची उपासना केली जाई. अर्थात पश्चिम आशियातूनच तिचा प्रसार दक्षिण भारताकडे होत गेला हे निश्चित होय.

बलुचिस्तानमधील हिंगलाज पर्वतामध्ये ती येण्यापूर्वी तीच मुलस्थान प्राचीन अनातोलिया संस्कृतीमध्ये असावे. अर्थात अनातोलिया हि आर्यांची मूळभूमी मानली जाते. तिलाच बोघाझकोई वा आशिया मायनर म्हटले जाते. आज ते तुर्कस्थानमध्ये आहे. तेथील उत्खननात 'शताल हूयूक' या शहरात सिंहवाहिनी मातृदेवता सापडली असून तीचा काळ इ. स. पू. ६००० म्हणजे नवाश्मयुगाचा आहे. इ. स. १९६१ साली इंग्लडमधील पुरातत्त्व संशोधक जेम्स मेल्लार्ट याने उत्खनन करून तिचा शोध लावला.[१७] अनातोलिया येथून विविध पाश्चिमात्य संस्कृतीमधून ती भारतात आली हे निश्चित होय. अनातोलिया संस्कृतीच्या नाशानंतर उदयास आलेल्या सुमेरियन संस्कृतीच्या लोकांनी इनान्नाच्या स्वरूपात तिचा स्विकार केला. तिला सुमेरियन्स इन्नीन, निन्नी, इर्मिना, नाना, व निन इ. विविध नावांनी संबोधीत असत. आजही पाकिस्तानात तिला 'नानी' या नावानेच संबोधतात, हे विशेष होय. इश्तार विषयक पुराकथामध्ये ताम्मुझ या तिच्या प्रियकराचा नेहमी उल्लेख येतो. त्याला तिने रागाच्या भरात ठार केलं. (जसे भारतीय ब्राह्मण लक्ष्मी चर्मकार पतीला ठार मारते तसे.) परंतु नंतर तिला पश्चाताप झाल्यावर नाना रूपात तिने त्याचा शोध घेतला. इनान्ना अर्थात इश्तार मातृदेवता असेरियन वा पणी-फोनेशियन

लोकांद्वारा सिंधु संस्कृतीत आली असावी. तेथे सिंहवाहिनी इनान्नाचे नामरूपांतर सिंहलाचे हिंगला झाले असावे. सिंध प्रांतातून, काठेवाड, गुजरात, कोकण मार्गे ती गडहिंग्लज व कर्नाटक या मार्गे या देवीचा प्रसार होत गेल्याचे सिद्ध होते. लक्ष्मी, दुर्गा, काली इ. विविध नावांनी तिचा प्रसार हळूहळू प्राचीन कालखंडात होत गेला. या संदर्भात कोलांच्या मातृदेवता उपासनेचा संदर्भ विशेष करून लक्षात घेण्यासारखा आहे. बलुचिस्तान मधील कोरी नदीच्या आसपास राहणारे 'कोल' यांची मातृदेवता हिंगुलाबिका हिच होती. तेथून कोल अर्थात कोळी हे कच्छ, काठेवाड, गुजरात, उत्तर कोकण, दक्षिण कोकण, कर्नाटक व केरळपर्यंत पसरले. देवीकोशकार प्रभुदेसाई नमूद करतात, "कोल हि जमात सह्याद्रीच्या पुर्वेकडे कोल्हापूर सातारा भागात वस्तीकरून होती. कोल्हापूर हे शहर त्यांनीच वसवले. महिषासुराचा विध्वंस केल्यावर आर्यांनी या जमातीचे उच्चाटन केले. ज्या देवीच्या कृपेने ते विजयी पावले तिचे नाव त्यांनी 'कोलासुर भयंकरी' असे ठेवले." नदीच्या काठाने जे लोक रहात त्या लोकांना नदीचे नाव मिळते हे इतिहासातून दिसून येते. कोरी लोकांना ते नाव नदीवरून पडले असून ते स्थाननाम जातिनाम झाले.[१८] काठेवाडात कोळ्यांची वस्ती सुमारे चार लाख आहे. तेथील कोळी आपला पूर्वज सिंधु नदीच्या परीसरातून आल्याचे सांगतात. तेथील कोळ्यांची हिंगलाज ही देवी आहे. ही देवी हिंगुळजा या नावाने अनेक महाराष्ट्रीय ब्राह्मणकुलाची कुलदेवता झाली आहे.[१९]

या पुराव्यावरून आपणास सेमेटिक व सुमेरियन लोकांच्यातील 'इनान्ना' चे 'इश्तर' आणि इश्तार चे 'हिंगुळजा' देवी असे स्वरूपांतर सहज लक्षात येते. हिंगलाईचे उपासक म्हणून कोलांची पार्श्वभूमी लक्षात घेतल्यावर भारतातील आणखी काही उपासक व हिंगलाईच्या प्रसाराचा आढावा घेता येईल. दक्षिण भारतातील करुविक्करन (पारधी) हे दुर्गेचे मोठे उपासक आहेत. रेडा बळी देण्याची त्याची प्राचीन काळापासूनची प्रथा आहे तशीच ती महाराष्ट्रातील फासेपारध्यांच्यामध्येही आहे. याशिवाय महाराष्ट्र व जयपूर मधील खत्री जातीमध्ये दसरा व दुर्गाउपासना अत्यंत उत्साहात साजरा करतात. महाराष्ट्रातील कोल्हाटी, महार, मांग इ. जाती हिंगुलाईची पूजा मरीआईच्या स्वरूपात करतात. काठेवाडातील भावसार व वांझा हिंगुळेचे मोठे पूजक आहेत. उत्तर प्रदेशात हिंगुला 'जबारी', उत्तर प्रदेशात 'छाछीदेवी' तर नेपाळमधील गुरखा तिची पुजा 'चंडेश्वरी' स्वरूपात करतात. बिहारमधील सिंगभूम भागातील पोरहट या गावी हिंगुलाक्षी देवीचे मंदिर आहे. तिला 'मापौडी देवी' असेही म्हणतात. मध्ययुगीन कालखंडात कोलांचा तेथील स्थानिक राजांशी संघर्ष झाल्याचा इतिहास आहे. नेमाडचे 'कामद' हे सुद्धा हिंगलाईचे उपासक आहेत त्यांचा पूर्वपरंपरागत व्यवसाय हा जादूगरीचा आहे. बिहारमधीलच रामगड येथे मुंडेश्वरीचे सुंदर विलोभनिय मंदिर असून तिची मुर्ती महिषासुरावर विराजमान झालेली दाखविली आहे. महाराष्ट्रात सोलापूरातील साखरपेठेत हिंगुळांबिकेचे एक छोटे परंतु प्रसिद्ध मंदिर आहे. कोकणात चौल येथे हिंगुळा देवीचे मोठे प्राचीन मंदिर आहे. टॉलेमीने आपल्या ग्रंथात या बंदराचा उल्लेख टिमुळा असा केला आहे. दहाव्या शतकात गुजरात मधून आलेल्या भंडसाळी व्यापाऱ्यांनी चौल येथे येवून हिंगुळा देवीचे मंदिर बांधले. मंदिरातील मुर्ती महिषासुरमर्दिनी स्वरूप आहे.[२०] तुळजापूरच्या अरण्यबुवा मठात हिंगुळा देवीची छोटी मुर्ती आहे. तेथे नवरात्र उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. त्यावेळी १२ बकरी बळी देण्याची प्रथा आहे. भिमा-काणिगा नदीच्या संगमावर नारायणमुनींनी हिंगुला देवीची मुर्ती स्थापित केली आहे. याशिवाय जोधपूर जवळील पालडी गावात तिचे विशेष मंदिर असून मंदिरातील मुर्तीत महिषाची मान तोडलेली नाही कि असुर त्यातून बाहेर आलेला नाही. यावरून कालपरत्त्वे मुर्तीत बदल होत गेला आहे हे निश्चित होते. महाराष्ट्र, राजस्थान व कर्नाटकातील बंजारा, वंजारी वा बंजारण जमातीत होळीची पूजा हिंगळामाता म्हणून नृत्यगान करून आनंदोत्सवात साजरी करतात. त्यांच्या लोकगितांमधून 'हिंगळामाता' ची प्रार्थना दिसून येते. तोडा जमात हिंगळामाताची पूजा महिषीच्या स्वरुपात करतात. राजस्थानात बिकानेर पासून सुमारे विस मैल अंतरावर देशनोक या मरूभूमी गावात आणखी एक प्राचीन मंदिर आढळते. काठेवाड मधील वांझा (विणकर) हिंग्लजमाताची उपासना करतात. कोल्हापूर जिल्ह्यात देशाच्या फाळणी नंतर पुनर्वसन करण्यात आलेल्या सिंधी समाजाचे लोक हिंगुलादेवीची पूजा सिंधभवानी या नावे करतात. नवरात्र उत्सव रास-दांडिया खेळाने साजरा करतात. कुमारिकेला ते नैनी म्हणजे देवी किंवा शक्ती समजून अनेक धार्मिक विधीत तिला मानाचे स्थान देतात.[२१] हिंगुळा देवीचे मुळ नाव *'इनान्ना'* चे ती प्रतीरूप मानली जात असावी. श्री. विनोदतोष भट्टाचार्य यांच्या शक्ती संगमतंत्र या ग्रंथात,

*लंकाप्रदेशमारभ्य मक्कान्त परमेश्वरी।*
*सैंधवाख्यो महादेशः पर्वते तिष्ठति प्रिये।।*
- पटल ७.१७

या तंत्रश्लोकात सिंधच्या महादेशातील पर्वतावरील तिष्ठत असलेली मक्कान्त परमेश्वरी असे हिंगुला देवीचे यथार्थ वर्णन आहे.[२२] ती मक्केची परमेश्वरी अधिष्ठात्री म्हणजे *'अल-निना'* हिच होय.

**इ) महिष व दुर्गेचे मूलवास्तव :-**

महाभारतीय कथानकात मातृसत्ताक पांडवांची कुलदेवता दुर्गा होती. मत्स्यांच्या विराट नगरीत अज्ञात वासाचे एक वर्ष व्यतीत करण्यासाठी शिरण्याआधी युधिष्ठिराने मदतीसाठी तिचा धावा *"महिष-असुर-मर्दिनी"* व *'विंध्य-वासिनी'* या नावांनी करतो (४.६.१५.१७) या प्रार्थनेत युधिष्ठिर तिला कृष्णाची भगिनी (४.६.४) म्हणून संबोधतो. पांडव हे मध्य वा दक्षिण भारताचा एक स्त्रीसत्ताक वा मातृवंशक गण होते. ज्यांचे पितृसत्ताक कौरवांशी कसलेही नाते नव्हते.[२३] या दुर्गेला कॉ. शरद पाटील निर्ऋती असे संबोधतात.

प्राचीन तामिळ महाकाव्य शिलप्पदिकारम्, विल्लुवर व मिनवर या तामिळ आदिवासींना प्रथम जिंकणारे नाग हे भयंकरी देवी कालीची पूजा करीत आणि तिच्या देवळामध्ये अनेक हेल्यांना (महिषांना) बळी देत. कालीची मुर्ती अत्यंत भीतीदायक पद्धतीने सजवलेली असे.......... तिच्या मूर्तीपुढील ढोल पिंपाण्यांच्या गजरात उग्र नाग तिच्या वेदीवर हेल्यांचा बळी देत. बळींचे रक्त वाहत असतनाच काली अंगात आल्याने उन्मत्त होऊन उठलेली पुजारीण कापत व बेभानपणे ओरडत असे........... काली स्त्री दैवत असल्यामुळे तिच्या उपासिका तिला घंट्या, बाहुल्या, पोपट, रानकोंबड्या व तामिळ स्त्रियांचे करमणुकीचे साधन असलेले मोर अर्पण करीत.[२४] या कालिला तमिळ मध्ये **'ऐयई'** असेही म्हणतात. कालीच्या गळ्यातील घंटा बळी चढवल्या जाणाऱ्या हेल्या गळ्यात अर्पण करण्याची प्रथा उत्तर सातवाहन कालापर्यंत अस्तित्त्वात असल्याचा पुरावा गाथा सप्तशती मध्ये मिळतो तो असा,

*गह-वाइणा मुअ-सैरह-डुण्डुअ-दामं चिरं व हेऊण।*
*वग्ग-सआइं णेऊण णवरि अज्जा-घरे बद्धम्।।१७२।।*

**अर्थ :-** मेलेल्या रेड्याच्या गळ्यातली मोठ्या घंटांची माळ घरधन्याने पुष्कळ दिवस ठेविली, शेकडो कळपात नेली, आणि शेवटी चण्डिकेच्या देवळात नेऊन बांधली.[२५]

चण्डिका अर्थात महिषमर्दिनीला बली चढवाव्या लागणाऱ्या धष्टपुष्ट रेड्याचा शोध चंडिकेच्या घंटांच्या माळेने घेण्याची रित या काळात असावी. या गाथासप्तशतीग्रंथात नवरात्राच्या पहिल्या दिवशी घटस्थापनेचा विधी सुद्धा आला आहे. नवरात्रानंतर येणाऱ्या दहाव्या दिवशी म्हणजे दसरा वा विजया दशमीला रेडा मारणे हा महाराष्ट्र, आंध्र व कर्नाटक मधील सर्वात लोकप्रिय महोत्सवाचा एक अविभाज्य विधी आहे. दसऱ्याचा अर्थ होतो दहावी रात्र *'दशेरा'* होय. विजया हे मातृदेवता दुर्गेचे एक नाव आहे. तो दुर्गेचा दहा दिवसांचा महोत्सव साजरा केला जातो. राजसूय यज्ञातील वर्णनानुसार जसे त्रि-अंबा घोड्याला बळी देते तसेच रेड्याचा दुर्गा बळी घेते म्हणूनच दुर्गेला महिषासुर नाशिनी म्हणतात. महाकाव्यानुसार नर्मदा तिरावरील लोकांना महिषक असे म्हटले आहे. मालती माधव नाटकाच्या कथा वस्तूचा आविष्कार माहिषक प्रदेशात होतो. म्हणून माहिषकांची सुदर्शनेसारखी महिषी तिच्या ब्रह्मन पतींना ठराविक मुदतीनंतर दुर्गेच्या *'कराल-आयतनात'* बळी देई, त्यांच्या शवांशी समागम करी आणि त्यांचा *'मेध शोषून घेऊन'* गण व निसर्गाचे पुनरूत्पादन करी.[२६]

अथर्ववेदीय ५.७.८ या ऋचेत वर्णन केलेल्या निर्ऋती मातेप्रमाणेच नग्नी, मुक्तकेशसंभार वाऱ्यात विलक्षणपणे उडत असलेली नरमुंडांच्या व अस्थींचे अलंकार व माळा घातलेली अशी ही दुर्गा देवळात नाही, तर तिच्या *'विश्वरूपी'* मातृगणासह स्मशानात राहते. दुर्गा मंगलवन या मंगल क्षेत्रात व वनात तिच्या दैवी धर्म पतींशी, एकादश रुद्रांशी, प्रणयक्रीडा करते. शिव-रुद्र व महिषासुर हे एक होते हे महिष+असुर या समासातील दोन शब्दांवरून निर्णायकरित्या सिद्ध होते. त्याचा शब्दश: अर्थ होतो **'महिषीचा ब्रह्मन असुर धर्मपती'**. अशा प्रकारे निर्ऋती दुर्गेकडून केल्या गेलेल्या प्रेता (कटा) वस्थेतून महिषासूर शिव-रुद्राचा निसर्गाचे पुनरूज्जीवन प्रतिबिंबित करणारा पुनर्जन्म होतो.[२७] या अर्थपूर्ण विवेचनातून शिवाचे एक नाव महेष (महिष) असून तो दुर्गेचा पती असल्याचे सिद्ध होते. महिषासुर हा मातृदेवता दुर्गेचा ब्रह्मन पती होता की ज्याचा बळी दर बारा वर्षांनी द्यावा लागतो. ब्रह्मन नियतकालिक पतीला बळी देण्याच्या प्रथेतूनच अनार्य-द्रविडांवर दास होण्याची वेळ आली असावी. हा आर्य-द्रविड संस्कृत संगम सिंधू संस्कृतीत वा ततपूर्वीच्या संस्कृतीत झाला असल्याचे संभवनीय आहे. शिव व महिषासुराची एकात्मता स्पष्ट करताना दामोदर धर्मानंद कोसंबी लिहितात,

*'मोहेंजोदारो येथील ठशावर तीन तोंडी नग्न देवाची जी एक आकृती आहे ती आधुनिक शिवाची प्राथमिक आवृत्ती असणे सहज शक्य आहे. परंतु त्या दैवताला-म्हशींच्या दैवताला-म्हशींच्या शिंगाचे शिरोभूषण आहे. ज्या महिषासुराला चिरडल्याकारणाने पार्वतीला 'महिषासुर मर्दिनी' हे नाव प्राप्त झाले त्या महिषासुराचा मेढपाळ महिषी-देव 'म्हसोबा' शी समन्वय साधला जातो ही काही अपतत: घडलेली गोष्ट नसावी. पार्वतीचा काही वेळा योगेश्वरी या नावाने म्हसोबाशी साम्य असणाऱ्या एका देवाशी विवाह झालेला आढळतो; हा म्हसोबा जवळ जवळ शिव भैरवासारखा दिसू लागतो.... कालीच्या*

*रूपाने शिवाच्या आडव्या शरीरावर म्हणजे बहुधा त्याच्या प्रेतावर-नृत्य करणाऱ्या पार्वतीची मूर्ती आणि तशाच प्रकारच्या कालिघाट येथील चित्रांवर काही प्रकाश पडेल. कालीच्या जीवनदायक नृत्याने शिवाला परत जीवदान मिळते ही एक अनिवार्य संघर्षाची तीव्रता कमी करण्यासाठी केलेली भरती असावी हे स्पष्ट आहे.'*[२८]

या शिवाचा झालेला महिषासुरच महाराष्ट्रातील सर्वात लोकप्रिय व गावोगावच्या वेशीवरच्या माळरानावर म्हसोबाच्या स्वरूपात ठाण मांडून बसला आहे. यास्तव महिषासुर कोण होता? याचे उत्तर आपणास समजते. जसे सुमेरियन इनन्नाला द्रविडकुलांनी व अनार्यांनी हिंगुलजा स्वरूपात स्विकारली तसेच प्राचीनोत्तर काळात आंध्र-कर्नाटकात (महिषकदेश) तिला मरीअम्मा व पोचम्मा स्वरूपात स्विकारले तर महाराष्ट्रात मरीआई, म्हसाई, मसाई वा मेसाई च्या रूपात पूज्य मानले.

महिषासुराच्या वास्तवरूपाचा शोध घेताना डॉ. स. अं. डांगे यांनी म्हटले आहे, उत्तम पिकांसाठी रेड्याचा बळी देण्याची परंपरा प्राचीन काळापासून चालत आली आहे. रेडा हा भू-देवीचा बीजदाता आहे, अशी संकल्पना त्यामागे आहे. या कल्पनेतूनच महिषासूर व देवीच्या प्रेमप्रकरणाची पुराकथा रचली गेली. शेतीसाठी बैलाऐवजी रेडयाचा वापर करणाऱ्या समाजात या कथेची निर्मिती झाली असावी. ती असुरांची परंपरा असून ते भारतातील आर्यपूर्व प्रगत अशा सिंधू संस्कृतीतील लोक असावेत. नवरात्र उत्सवात महिषासुराला खलनायकी स्वरूपात दाखवणं, हा ब्राह्मणी धर्माचा प्रभाव होय. देवी आणि तिचा बळी रेडा यांचा विधी हा वैदिकेत्तर परंपरेतून आला आणि एकसंघ हिंदू परंपरेत रूळला. त्यातही मुळात हा विधी कृषीजीवनातून आला. एकदा तो रूळल्यानंतर सुबत्तेसाठी *'महिषासुर'* ही संकल्पना निर्माण झाली आणि साधा महिष (रेडा) हा दैवी (व पुढे असूर) झाल्यानंतर तोच *'कर्षक'* रेडा भूदेवीचा प्रतिपती आणि त्याच बरोबर तिच्या जननक्षमतेसाठी आपले शरीरद्रव्य (रक्त) देणारा तिचा बळी झाला.[२९]

महिषमर्दिनी दुर्गेचा संबंध सुमेरियन मातृदेवता *'इनान्नाशी'* तसेच प्राचीन अनातोलिया संस्कृतीतील नवाश्मयुगीन शताल हुयूक या सिंहवाहिनी मातृदेवतांशी अनेक संशोधक लावतात. तेथून ती असेरियन वा आर्यांच्या स्थलांतरा बरोबर भारतात आली असावी. आर्य वैदिकांनी आपल्या पुरुषदैवतपंचायतनात तिचा स्विकार केला असावा. भारतखंडात त्यांचा प्रवेश झाल्यानंतर कृषीप्रधान मातृसत्ताकांशी त्यांचा संघर्ष घडून आला. सिंधू जनांशी त्यांचा उग्र संघर्ष घडून आला. वैदिकांनी त्यांना आपल्या धर्म व राजसत्तेखाली आणले. अवैदिकांच्या कृषीजीवनातील भूमातेला बळी (रेडा) देण्याच्या प्रथेत दोन भिन्न संस्कृतीतील संघर्षाची किनार प्राप्त झाली. मुळात सौम्य प्रकृती सिंहवाहिनी दुर्गेच्या (इनान्ना) मुर्तीशास्त्रात बदल होत जाऊन ती उग्र दाखविली जाऊ लागली. पराभूत सिंधुजनांच्या महिषाचा अर्थातच महेषाचा वध करणारी शिल्पे घडविली जाऊन त्याला अनेक पुराकथा जोडण्यात आल्या. भटक्या पारध समाजाचे कुलचिन्ह सिंह व स्थिर पशुपालक कृषी प्रधान समाजाचे कुलचिन्ह महिष (रेडा) असणाऱ्या या दोन भिन्न समाजातील संघर्षाची प्रतिके असणारी शिल्पे घडविण्यात येऊ लागली. सिंह व महिष या वन्यजीवांच्या जीवनचक्राच्या परिशिलनात आणि त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या मानवी समाजाच्या संघर्षात परिणत झाला. जेत्या सिंहकुलचिन्हलक्षणवादी समाजाने, भारतात जित महिषकुलचिन्हलक्षणवादी समाजावरील आपले प्रभुत्त्व दाखविण्यासाठी महिषासुरमर्दिनी स्वरूप महिष बळींची शिल्पे घडविण्यास प्रारंभ केला. हिच शिल्पे महाकाव्य व पुराण निर्मिकांना कथा निर्मितीस पुरक ठरली.

दुर्गा देवीची पूजा मुर्तीच्या स्वरूपात केली जात असली तरी तिची पूजा करण्याची मूळ रूढी घटाच्याच स्वरूपात होती व अजूनही ती जपली जात आहे. दुर्गा देवी ही भूमातेचे प्रतिक असून अन्नप्राप्तीसाठी पिकांच्या सुफलनाची ती देवता आहे.[३०] असे मत श्रीमती योशिनोरी ओनिशि या विदुषीने आपल्या *'Feminine Multiplicity'* या ग्रंथात नोंदविले आहे. श्री देवदत्त काली या लेखकांनी आपल्या *'The Hidden Wisdom of the Goddess'* या ग्रंथात महिषासूरमर्दिनी या संज्ञेचा अर्थ *'A name of Durga in her central role as the destroyer of ignorance'* म्हणजे अज्ञानाचा विनाश करणारी[३१] असा दिला आहे. भारतात आर्यांच्या झालेल्या आगमनावेळी त्यांचे अनार्य द्रविडांशी झालेल्या संघर्षाचे चित्रण दुर्गेने महिषासुराचा वा हेल्याच्या पौराणिक-काल्पनिक कथेत मांडले गेले. यासंदर्भात *Wendell Beane* म्हणतात, वैदिक कालखंडाच्या प्रारंभी धार्मिक व राजकीय निश्चितीसाठी हा मोठा सामाजिक व राजकीय संघर्ष घडून आला.[३२] ते पुढे म्हणतात, *"............... it was yet considered that the goddess. Durga - kali was indeed an idecomorphic epiphancy of the primordial Earth Mortheor (Terra mater)''.*[३३] कालि-दुर्गेच्या उगमाबद्दल धर्मशास्त्राचे गाढे अभ्यासक जनार्दन रघुनाथ जोशी लिहीतात, *The origin of Sakti-worship is to be traced to the early, Neolithic Poriod over wide regions of the world or that it was the outcome of a female - dominated society.*[३४]

### उ) निष्कर्ष:-

दुर्गा व महिषासुराचे मूलवास्तव स्वरूप जाणून घेत असताना आपणास मातृसत्ताक कृषी संस्कृतीतील उत्पादनतंत्रातील बदल व कृषी यातूविधिच्या अनन्य सहसंबंधावर लक्ष केंद्रित करावे लागते. आदिम युग्मप्रधान सहजीवनात अन्न संकलन ते अन्न संग्राहक या वाटचालीत अन्न उत्पादक हा मानवाच्या विकासात निर्णायक टप्पा राहिला. अन्न उत्पादनात *'शेती'* ने मानवाला स्थिरता देण्याबरोबर स्त्रीप्रधान अर्थ व्यवस्थेला चालना देऊन गणाचे नेतृत्त्व जेष्ठतम गणमुख्याकडे सोपविले. स्त्रीयांनी लावलेल्या शेतीच्या शोधाचा हा परिणाम होता. जवळपास सर्वच संस्कृतीमध्ये हा आदिबंध होता. उत्पादन व्यवस्थेचे नियंत्रण व वितरण या दोन्ही गोष्टी तिच्याच हातात होत्या. मासेमारी, शिकार व पशुपालन ही दुय्यम परंतु शेतीस पुरक व पुरुषी मक्तेदारी असणाऱ्या उत्पादन तंत्रज्ञानाची साधने पुरुषांच्या हाती राहिली. हवामानाच्या बदलाबरोबर वाढत्या लोकसंख्येस अन्न उत्पादनाचा अधिक पुरवठा करणे व अधिक उत्पादन घेऊन व्यापार विनिमय करून जीवनावश्यक वस्तूंची देवाण-घेवाण करणे यासाठी उत्पादन तंत्रात बदल करणे आवश्यक बनले. त्यासाठी स्त्रीयांच्या परंपरागत काष्ठ-कुदळाऐवजी आता अधिक बलशाली प्राण्यांचा उपयोग पुरुषांच्या साह्याने उत्पादनात केला जाऊ लागला. कृषीप्रधान अर्थव्यवस्थेत सर्वप्रथम स्थीर झालेल्या अनार्य आद्य-द्रविड वा द्रविडांनी खचितच रेड्याचा वा वशिंडाचा वापर शेतीसाठी केल्यावर स्त्रीप्रधान अर्थव्यवस्था जाऊन गणप्रधाक मातृसत्ताकतेचा लोप झाला. कृषी यातुविद्येत ज्या रेड्याचे रक्त नवजीवन व सुफलनाचे प्रतिक आणि भूमातेचे रजसत्त्व म्हणून कसलेल्या शेतास अर्पण केले जाई त्याच्याच नांगराने स्त्री वा मातृसत्ता लोप पावली. रेडा वा वशिंड लिंगभावी अर्थप्रधान सत्ताबदलास कारणीभूत ठरला. मातृसत्ताकतेकडून समाजव्यवस्थेने पितृसत्ताकतेकडे केलेल्या प्रयाण प्रमाणाचे एक दुशचिन्ह म्हणून महिषवधात्वाकडे आपणास पहावे लागते.

गडहिंग्लजच्या हिंगलजाईच्या सत्य व मुलस्वरुपाचा शोध घेताना तिचा प्रवास प्राचीन अनातोलिया संस्कृतीतील शताल हुयूक येथून सुमेरियन मातृदेवता इनान्ना ते बलुचिस्तानातील नानी ते गडहिंग्लजची हिंगलजाई (महिषासुरमर्दिनी ) असा झाल्याचे स्पष्ट होते. तिचे स्थलांतर तिच्या उपासकांच्याबरोबर झाले असावे वा सांस्कृतिक समन्वयातून तिचा स्विकार एक-दुसऱ्या संस्कृतीत सतत होत गेला असावा किं वा आद्य द्रविडांनी हि मातृदेवता भारतात आणली असावी. तिचेच नामरूपांतर आज महिषमर्दिनी, दुर्गा वा महालक्ष्मीत झाल्याचे आज दिसून येते. महिषासुरमर्दिनीच्या कथा-महात्म-पुराणात आर्य-अनार्य संस्कृती संघर्षाची माहिती वर्णसंकर व पुरुषसत्ताकतेच्या विरोधात स्त्रीवादी संघर्षाची अजर-अमर कथा अधोरेखित होते. मातृसत्ताक सातवाहनांच्या वर्णाची माहिती यातून समजते. सिंहवाहिनी दुर्गेच्या मुळ मुर्तीत महिषासुर नंतरहून येऊन त्याला क्षुद्रत्व बहाल केल्याचे स्पष्ट होते. आखिल भारतीय स्तरावर राष्ट्रवादी भावनेची पेरणी करण्यासाठी महिषासुरमर्दीनी कथेची स्थानमहात्मे-कथा-मंदिरे निर्माण केली गेली असे असली तरी या सर्वांमधून हिंदू धर्मातील मातृदेवता दुर्गा-महिषमर्दिनी हि मुळची प्राचीन पश्चिम आशियाई संस्कृतीमधून आली असून त्यातून वैश्विक बंधुभाव व एकात्मता दिसून येते.

### फ) संदर्भ :-


१. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर,कोल्हापूर जिल्हा, दर्शनिका विभाग,महाराष्ट्र शासन मुंबई,मराठी आवृत्ती १९८९,पान नं. ६७६
२. प्रत्यक्ष मुलाखत, यशवंत शिवगोंडा पाटील (खातेदार), गडहिंग्लज दि. ०६/११/२०१७
३. साळुंखे नीरज, दैत्यबळी व कुंतलदेश महाराष्ट्र, लोकायत प्रकाशन सातारा, पहिली आवृत्ती २००२, पान नं. ४१
४. रायचौधरी हेमचंद्र,प्राचीन भारताचा राजकीय इतिहास, डायमंड पब्लिकेशन,पुणे,मराठी प्रथमावृत्ती२००६,पान नं.६८
५. रायचौधरी हेमचंद्र, उपरोक्त पान नं. ६३
६. डॉ. भोसले त. दा., संस्कृतीच्या पाऊलखुणा, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, ऑगस्ट २००४, पान नं. ५९
७. डॉ.केतकर श्रीधर व्यंकटेश, प्राचीन महाराष्ट्र, वरदा बुक्स,पुणे,दुसरी आवृत्ती १९८९ पान नं. २४९
८. डॉ. केतकर श्रीधर व्यंकटेश, उपरोक्त पान नं. २९१
९. श्री देवीभागवत (संपा. ओक ना. ग. देव ह. ना. व जोशी विनायकशास्त्री), क्षीरसागर आणि कं. पुणे, बारावी आवृत्ती २०१०, पान नं. २३४ व २३५
१०. श्री देवीभागवत, उपरोक्त पान नं. २६६, २६७
११. श्री दुर्गा सप्तशती कथासार (संपा. भिंगारकर कृ. ज्ञा.) अनमोल प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती २००७, पान नं. १४
१२. चित्रलेखा,मातृपूजन विश्वभजन, दुर्गा (लेख), प्रा.डॉ.राणा अशोक, ११ ऑक्टो २०१० पान नं. ३८
१३. जोशी सुरेश,महिषासुर खरा कोण होता? (लेख) जोशी सुरेश, संशोधनमुद्रा, कैलाश पब्लि. औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जुलै २००९, पान नं. २००७

१४. जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री (संपा.),राजवाडे लेखसंग्रह,साहित्य अकादेमी,दिल्ली,चौथी आवृत्ती १९९२,पान नं. ८० व ८१
१५. शक्ती उपासना अंक, प्रकाशक कल्याण,प्रथमावृत्ती जाने. १९८७ पान नं.४३६, ४३७, ४३८ व ४३९
१६. डॉ.फडके पु.नी., शालीवाहन राजवंश श्रीमंगेश प्रकाशन नागपूर,पहिली आवृत्ती २०१०पान नं. ७६
१७. www.wikipedia.org/catalhoyuk
१८. डॉ. राणा अशोक, मातृपूजन विश्वभजन, इनान्ना (पूर्वाध) लेख, चित्रलेखा, दि. १० मे, २०१० पान नं. ४२ व ४३
१९. डॉ. राणा अशोक, उपरोक्त पान नं. ४४
२०. डॉ.केतकर श्रीधर व्यंकटेश प्राचीन महाराष्ट्र,वरदा बुक्स,पुणे,दुसरी आवृत्ती १९८९, पान नं. ३४०
२१. डॉ. केतकर श्रीधर व्यंकटेश उपरोक्त पान नं. ३४०, ३४१
२२. प्रभुदेसाई प्रल्हाद कृष्ण, देवीकोश, खंड-२ उपरोक्त पान नं. ६८५
२३. कॉ. पाटील शरद, दासशुद्रांची गुलामगिरी,खंड-१, भाग-१,प्राज्ञ प्रकाशन वाई, प्रथमावृत्ती १९८२ पान नं.१६८, १६९, १७०
२४. कॉ. पाटील शरद, उपरोक्त पान नं.
२५. सातवाहन राजा हाल, गाथा सप्तशती (मराठी अनुवाद शेफालिका), महाराष्ट्र, राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती १९८४, पान नं. ७३
२६. कॉ. पाटील शरद, उपरोक्त, पान नं. २८४, २८५
२७. कित्ता, पान नं. २९० व २९१
२८. कोसंबी दामोदर धर्मानंदर,पुराणकथा आणि वास्तवता, लोकवाङमय गृह,मुंबई चौथी आवृत्ती डिसें.२००७ पान नं.२० व २१
२९. डॉ.डांगे सदाशिव अंबादास, पुराकथांचा अर्थ,वाद आणि विवेचन,कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे,प्रथमावृत्ती १९९३ पान नं. २४७
३०. Ohishi yoshinori, feminine Multiplicity: A study of groups of multiple goddesses in India, Indian Book contne, Delhi, first Edition 1997, Page No.102
३१. Kali Devadatta, The hidden wisdom of the Goddess, Motilal Banarsidass Pub. Pvt. Ltd., Delhi, First India Edition 2010, Page No. 234
३२. Beane Wendell Charles, Myth, cult and symbols in sakta Hinduism; A study of the Indian Mother Goddess, Munshiram manoharlal pub. Pvt. Ltd. New Delhi, First edition, 2001 Pge No. 93
३३. Beane Wendell Charles, I bid Page No. 145
३४. Joshi J. R., Minor Vedio Deities, university of Poona, First edition, 1978 Page No. 110



**प्रा. रामचंद्र गुर्लिंग घुले**
**सहा. प्राध्यापक (इतिहास) मा. व. पा. कन्या महाविद्यालय, इस्लामपूर, ता. वाळवा, जि.सांगली.**